**ठळक बातम्या**

- राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलचा आभार प्रस्ताव लोकसभेत मंजूर, कामकाज संस्थगित
- देश सर्वप्रथम या तत्त्वावरच आपलं सरकार काम करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आभारप्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना प्रतिपादन
- सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी महाराष्ट्र विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे पाच दिवसांसाठी निलंबित /हा एकतर्फी, आणि लोकशाहीविरोधी निर्णय असल्याची उद्धव ठाकरे यांची टीका
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १४ उमेदवारांचे एकूण २४ अर्ज दाखल

**आणि**

- उत्तर प्रदेशातल्या हाथरस जिल्ह्यात सत्संगादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ७५ हून अधिक लोकांचा मृत्यू

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेचं कामकाज आज संस्थगित झालं. २४ जूनला सुरु झालेलं हे कामकाज उद्या संपणार होतं. मात्र आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्ताव मंजूर केल्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केल्याची घोषणा सभापती ओम बिर्ला यांनी केली.

**<><><><><>**

देश सर्वप्रथम या तत्त्वावरच आपलं सरकार काम करत असून भ्रष्टाचाराच्या विरोधातल्या आपल्या लढ्यामुळंच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जनतेने सलग तिसऱ्यांदा आपल्यावर विश्वास व्यक्त केला आहे असं प्रतिपादन

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावर लोकसभेत झालेल्या चर्चेला ते उत्तर देत होते.

गेल्या १० वर्षातल्या रालोआ सरकारच्या कामगिरीचा आढावा घेत मोदी यांनी सांगितलं, देशाची अखंडता आणि एकात्मता यांच्या सुरक्षिततेसाठी भारत कोणत्याही थराला जाऊ शकतो याची खूणगाठ जगाला पटली. २५ कोटी नागरिक गरीबीतून बाहेर पडले. काश्मीरमधे लष्करावर दगडफेक व्हायची. ३७० कलम रद्द झाल्यावर ती थांबली. विकासाच्या वाटेवर गेल्या १० वर्षात आता भारताची स्पर्धा स्वतःशीच आहे. असं ते म्हणाले. जनतेने कौल स्पष्टपणे रालोआच्या बाजूनं दिला असूनही त्याबाबत काँग्रेस अपप्रचार करीत असून जनतेची दिशाभूल करीत आहे, अशी टीका त्यांनी केला.

आभारप्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान काल सभागृहात अनुचित आणि असत्य वक्तव्य झाली असं सांगत, त्याबाबत कठोर कारवाई करण्याची मागणी मोदी यांनी सभापतींकडे केली. देशाच्या प्रगतीत अडसर निर्माण करण्याचं, जगात देशाची नाचक्की करण्याचं कारस्थान रचलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला. नीट परीक्षेतल्या घोटाळ्याची गंभीर दखल सरकारनं घेतली असून त्याचा तपास केंद्रीय यंत्रणांमार्फत सुरु आहे, असं त्यांनी सांगितलं.

देशाच्या विकासाकरता निकोप स्पर्धा करण्याचं आवाहन त्यांनी विरोधी पक्षांना केलं. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यात त्यांनी सुप्रशासनाचे मानदंड निर्माण करावे असं ते म्हणाले.

प्रधानमंत्र्यांचं भाषण चालू असताना विरोधकांनी सरकारविरोधी घोषणा देत सभागृह दणाणून सोडलं.

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान लोकसभेत राहुल

गांधी यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल भाजपाच्या बांसुरी स्वराज यांनी आज हक्कभंगाची नोटीस बजावली. राहुल गांधी यांनी सभागृहात सांगितलेल्या काही गोष्टी चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या असून त्याकरता त्यांच्यावर कारवाई करावी असं स्वराज यांनी या नोटिशीत म्हटलं आहे.

दरम्यान आपल्या भाषणातले अनेक अंश गाळल्याचा निषेध करुन, ते पुन्हा नोंदीत समाविष्ट करण्याची मागणी करणारं पत्र राहुल गांधी यांनी सभापती ओम बिर्ला यांना लिहीलं आहे.

**<><><><><>**

सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी महाराष्ट्र विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना पाच दिवसांसाठी निलंबित केलं आहे याबाबतचा ठराव आज विधानपरिषदेत उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला. तो आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आला. यासंदर्भात विरोधकांची बाजू ऐकून घ्यावी, असा आग्रह विरोधी पक्षांनी केला, मात्र अशा प्रकारच्या ठरावांवर कधीही चर्चा होत नाही, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. यावर विरोधकांनी हौद्यात उतरून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात घोषणा दिल्या आणि सभात्याग केला.

निलंबनाचा निर्णय हा एकांगी आणि अन्यायकारक असल्याची प्रतिक्रिया विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली. हा आपल्या स्वातंत्र्यावर हल्ला असून विरोधकांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न असल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं निलंबन हे एकतर्फी असून हा लोकशाहीविरोधी निर्णय आहे, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. सभागृहात एखादा प्रस्ताव आल्यानंतर त्यावर चर्चा करणं,

दोन्ही बाजू मांडू देणं आवश्यक असतं. मात्र दानवेंना बाजू मांडायला वेळ दिली गेली नाही, असं ठाकरे बातमीदारांशी बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

शेतकरी, कष्टकरी, कामगार, युवा आणि वारकरी यांच्या कल्याणासाठी सरकार कार्यरत असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावर विधानसभेत उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठीच्या लाभार्थ्यांची वयोमर्यादा ६५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. दारिद्र्य रेषेखालच्या कुटुंबातल्या लाभार्थ्यांना लगेच पैसे दिले जातील तर उर्वरित महिलांना अर्ज आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाली की जुलै पासूनचे पैसे दिले जातील, असंही ते म्हणाले. त्यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावरचा आभारदर्शक प्रस्ताव आवाजी मतदानानं विधानसभेत मंजुर झाला.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी योजनेचा पुढचा हप्ता वितरीत करण्यापूर्वी, अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना पुन्हा पात्र यादीत सहभागी करून घेतलं जाईल असं आश्वासन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विधानसभेत दिलं.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत अतिरिक्त अर्थसंकल्पावर चर्चेला सुरूवात केली. राज्यातल्या शेतकऱ्यांचे ६५ हजार कोटी रूपयांचं थकित वीज बील माफ करावं, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.अतिरिक्त अर्थसंकल्प राज्याला कर्जबाजारी करणारा असून गेल्या दोन वर्षात महायुतीनं २ लाख कोटी रूपये कर्ज काढले असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ सुधारणा विधेयक २०२४ ला आज विधानपरिषदेत मंजुरी देण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी तालुका पातळीवर तीन अशासकीय

सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीचे अर्ज भरायचा आज शेवटचा दिवस होता. अखेरच्या दिवसापर्यंत ११ जागांसाठी १४ उमेदवारांनी एकूण २४ अर्ज भरले आहेत. भाजपाच्या पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे यांनी आज अर्ज भरले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाने आणि भावना गवळी यांनी अर्ज भरला. काँग्रेसकडून प्रज्ञा सातव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर यांनीही अर्ज भरला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं शेकापच्या जयंत पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

अर्जांची छाननी उद्या होणार असून ५ जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. १२ जुलै रोजी मतदान होऊन त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

विधानपरिषदेच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज. मो. अभ्यंकर यांनी मुंबई शिक्षक मतदारसंघात विजय मिळवला तर मुंबई पदवीधर मतदारसंघात अनिल परब निवडून आले. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपाचे निरंजन डावखरे यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला. नाशिक शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किशोर दराडे विजयी झाले.

<><><><><>

उत्तर प्रदेशातल्या हाथरस जिल्ह्यात फुलराई गावात सत्संगादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ७५ पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले. त्यात अनेक महिला आणि मुलांचा समावेश आहे. सत्संगला मोठ्या प्रमाणावर गर्दी

झाल्यामुळे ही चेंगराचेंगरी झाल्याचं वरिष्ठ पोलीस अधीक्षक राजेश कुमार सिंग यांनी सांगितलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मरण पावलेल्यांच्या नातेवाईकांप्रती शोकभावना व्यक्त केल्या आहेत. या घटनेमागच्या कारणांचा तपास करण्याचे आदेशही आदित्यनाथ यांनी दिले आहेत.

प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांच्या मदतीची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली आहे.

**<><><><><>**

लातूरच्या नीट प्रकरणात अटक केलेल्या जलील खान पठाण आणि संजय जाधव या दोन आरोपींना न्यायालयानं ६ जुलैपर्यंत सीबीआय कोठडी दिली आहे. त्यांची पोलीस कोठडी आज संपली. त्यामुळे त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

महसूल गुप्तवार्ता संचालनाच्या अधिकाऱ्यांनी काल मुंबई विमानतळावर अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका भारतीय प्रवाशाला मुद्देमालासह अटक केली. हा प्रवासी बँकॉकहून मुंबईला आला होता. या प्रवाशाकडे ५ कोटी रुपये किंमतीचे गांजासदृश अंमली पदार्थ सापडले.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं या वर्षी जूनमध्ये मालवाहतुकीतून १४ हजार ७९८ कोटी रुपयांचं उत्पन्न मिळवलं आहे, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत ११ टक्क्यांनी जास्त आहे.